# ज्येष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी दिशादर्शन

## *अहवाल*

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या २७ वर्षाच्या वाटचालीत प्रथमच ज्येष्ठ नागरिकांना उपयुक्त ठरेल असा **ज्येष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी दिशादर्शन** कार्यक्रमाचे आयोजन दि. २७ जून, २००९ रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमात मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड व पुणे अशा ५ जिल्ह्यातील २७ (५ महिला, २२ पुरुष) ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते. विशेष म्हणजे या कार्यक्रमात एक महिला सहभागी ज्यानां रुढार्थाने ज्येष्ठ नागरिक म्हणता येणार नाही, परंतु त्यांची संस्था ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यरत आहे, त्यांची उपस्थिती ज्येष्ठ नागरिकांच्या कार्यक्रमात समाजातील इतर घठकांना सुद्धा आस्था आहे हेच दर्शवत होती.

आज ज्येष्ठ नागरिकांच्या संघटनांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे.ज्येष्ठ नागरिकांच्या संघटना सामाजिक परिवर्तनाच्या बाबतीत आपआपल्यापरिने अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहेतच परंतु आजच्या गतिमान युगात प्रत्यक्ष कार्य करताना नेमकेपणाने काम करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळेच आपण करत असलेल्या कामात मार्गदर्शनाची गरज आहे असे कार्यकर्त्यांना जाणवू लागले आहे. म्हणूनच या एक दिवसीय दिशादर्शन कार्यक्रमाचे आयोजन प्रबोधिनीच्या वतीने करण्यात आले होते.

ज्येष्ठ नागरिक संघाच्या महासंघाचे (फेस्कॉम) माजी अध्यक्ष व ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अखिल भारतीय उपाध्यक्ष श्री. मधुकर कुलकर्णी यांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. ज्येष्ठ नागरिक संघ ज्येष्ठांच्या समस्या सोडविण्याचे जे कार्य करत आहे ते निश्चितच स्तुत्य आहे मात्र समाजाच्या व पर्यायाने राष्ट्राच्या हिताचा विचार ज्येष्ठ नागरिक संघांनी केला पाहिजे असे ते आपल्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने आयोजित केलेल्या या प्रशिक्षणाची आवश्यकता त्यांनी थोडक्यात विषद केली.

या नंतर मा. श्री. शरद (बापूसाहेब) घाटपांडे यांनी सेवानिवृत्ती मानसिकता हे सत्र घेतले, श्री. घाटपांडे हे सध्या पुणे महानगर सहसंघचालक आहेत. जनकल्याण समितीचे महाराष्ट्र प्रांताचे कार्यवाह असताना सेवाव्रती योजनेची सुरुवात केली अन कित्येक निवृत्तांना समाजासाठी काही करण्याची ईच्छा आहे त्यांना एक वाट सापडली. या विषयाची मांडणी करतांना आयुष्यभर स्वतःसाठी व कुटुंबासाठी अर्थाजन करतांना इतर काही करण्याची इच्छा असताना देखील समाजासाठी काही करता आलेले नसते म्हणून हीच वेळ आहे की आपण समाजासाठी काहीतरी करु शकतो. एकदंरीतच सकारात्मक दृष्टीने आयुष्य कसे जगावे आपल्या अस्तित्वाचा समाज, कुटुंब सर्वांसाठी कसा उपयोगी करावा याबद्दल मार्गदर्शन केले.

या नंतरचे संस्थाबांधणी हे सत्र प्रबोधिनीचे महासंचालक डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी घेतले या चर्चात्मक सत्रात सहभागींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यात प्रामुख्याने संस्थेचे Vision (दृष्टी) व मिशन संकल्पना अधिक स्पष्ट असल्या पाहिजेत व संस्था उत्तमतेने चालविण्यासाठी लागण्याऱ्या महत्त्वाच्या मुद्यांची चर्चा केली.

ज्येष्ठ नागरिक संघाची उपक्रमशीलता हा विषय फेस्कॉमचे उपाध्यक्ष मा. श्री. विनायक दाते यांनी मांडला. यामध्ये त्यांनी ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यक्रमांचे स्वहिताय व परहिताय असे विभाग केले, स्वहिताय म्हणजे ज्येष्ठ नागरिकांनी स्वतःसाठीच्या उपयुक्त उपक्रमांची माहिती, तर परहितायमध्ये ज्येष्ठ नागरिक संपूर्ण समाजहिताचे कोण कोणते उपक्रम हाती घेतात या बद्दलची सविस्तर माहिती दिली.

समारोपाच्या सत्रात रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे सदस्य मा. श्री. अरविंद रेगे यांनी परस्परसंबंध व संवादाचे महत्त्व हा विषय अत्यंत प्रभावीपणे मांडला. कशापद्धतीने आपल्यातील परस्पर संबंध वृद्धीगंत करावे ते सोदाहरण स्पष्ट केले.

सामूहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

आयोजक या नात्याने आदल्या दिवशीच्या पाऊसाच्या पार्श्वभूमीवरही ज्येष्ठांची उत्साही उपस्थिती मनाला उभारी देवून गेली. सहभागींनी असे कार्यक्रम पुन्हा पुन्हा आयोजित करावेत असे सुचविले.

——————————————————